## १३ स्वामी विवेकानन्द - पोवाडा



(चाल - वगासारखी)

जिथं पाश्चिमात्य संस्कृतीचा डिंडिम धुमाकूळ
जिथं झगमग भौतिकतेची दिपवी नयनांना
अमेरिकारूप त्या अत्याधुनिक जगताला
(Ultra Modern दुनियेला)
अध्यात्मज्ञानाचा छंद। देऊन सुखकंद सच्चिदानंद।
विवेकानंद। अमर जगी झाला॥

(चाल) भुवनेश्वरी देवी माता। विश्वनाथ पिता। धन्य लाभतां।
सूर्यसम तेजस्वी पुत्र॥ विश्वकल्याण घरून सूत्र।
चालवी जो जगीं ज्ञानसत्र॥
जन्मदिन मकरसंक्रांत। दावी संकेत। 'वीरेश्वर' दत्त।
ज्ञानाचा भास्कर बनणार॥ कृतीने नरेंद्र ठरणार।
विश्वबंधुत्व उजळणार॥
आई होती शिवाची भक्त। भक्ति संक्रांत। होय पुत्रांत।
धन्य हो कसवा माऊलीचा॥ जन्मजात वारसा बाळकाचा।
'ॐ नमः शिवाय' मंत्राचा॥

(चाल)

ध्रुवापरी एक मनीं ध्यास। प्रत्यक्ष पाहिन देवास॥
आवडे साधुसहवास। करि धर्मग्रंथ अभ्यास॥
वैराग्य अंतरंगास। धरि देवभक्तिची कास॥

(चाल)

कधीं समोरी नरेंद्र ठेवुनि रामाची मूर्ति।
पूजा करुनी समाधि लावुनी करी रामभक्ति॥
तन्मयतेनें डोळे मिटुनी विसरुनिया भान।
शिवशंकर निश्चल जणु करतो रामाचें ध्यान॥

"याज्ञसन्न पाहुनी नरेंद्र फणींद्रही भुजंगा। (७)
फणा काढुनी जणुं वंदितसे नागभूषणाला ॥
समाधि लावुन बसला असतां धरुनि भाव शुद्ध।
शेतकऱ्याच्या रूपे भगवान दे दर्शन बुद्ध ॥
"नांगर फिरवी ज्ञानाचा मी साक्षात शेतकरी।
अज्ञानाचे तण उपटोनियां भक्तिबीज पेरी" ॥

(चाल) असामान्य असे कर्तृत्व। अंगी नम्रत्व। प्रखर वक्तृत्व।
अलौकिक सिद्ध ज्ञान भांडार। परि न ही ईश्वर साक्षात्कार
तळमळे अंतरिं अपरंपार। कोण गुरु सुपंथ दाखविणार॥

(चाल)

तळमळे जळाविण जशी काय मासोळी।
दो न्याविण कीं वावडो जशी आभाळीं।
सद्गुरुपायांविण कोण दिसेना वाली।
गुरुसाठीं वणवण गिरिगह्वर धुंडाळी ॥

(पद) कृपाळासी कुठें सद्गुरुराया पाव रे।
तव रूप सुभग मज दाव ॥ध्रु०॥
संसार-सागरीं असंख्य संशय लहरी
चहुंकडुनी त्यांचे धक्के बसती भारी
मम कुशलपणें वल्हवी जीवन नाव रे।
तव रूप सुभग मज दाव ॥१॥

पाहुनी सभोंती दुःखे जन लाचार
मन निराश होते गमे सर्व अंधार
म्हणुनी बोधाचा अंतरिं दीपक लाव रे।
तव रूप सुभग मज दाव ॥२॥

विरहानें साऱ्या शून्य दिशा मज गमती
नीरस हें भासे असार जीवन जगतीं
गति पार्थाची धांव कुठें तव ठाव रे ।
तव रूप सुभग मज दाव ॥३॥

(चाल)

जोमांत ब्राह्मसमाजाची तेव्हां चळवळ
मूर्तिपूजा, जातिभेद व्यर्थ वदतो जंजाळ
अबलांना शिक्षण देऊन बनवा सबळ
मनीं विचार घुमती असे । लावेरकें पिसें ।
असे वा नसे । दीनवत्सल ॥ भक्तवत्सल ॥
देवेन्द्र करती नेतृत्व ब्राह्मसमाजाचें
नाहीं करूं शकले समाधान त्याच्या चित्ताचें ।
तळमळे, न उत्तर मिळे, कूटप्रश्नाचे
कुठें नसे असे जर देव ? । कोण भूदेव ।
किंवा गुरुदेव । दाविल पद त्याचे ॥

(चाल) नरेंद्राची ऐकतां गोष्ट प्रिन्सिपाल हेस्टी ॥
शिष्यास पाहुन हिंपुटी जाहले कष्टी ॥
रामकृष्णांकडे धाडिती दावुन दूरदृष्टि ॥
गुरुदेव म्हणजे मूर्तिमंत करुणेची सृष्टि ॥
दयामेघ ओघळे करी स्नेहाची वृष्टि ॥

(चाल - डोंगर)

नरेंद्रानं नमस्कार केला । रामकृष्णांच्या समोर बसला ।
बोलती परमहंस त्याला । मानवजातीच्या उद्धाराला ।
वत्सा रे ! तुझा जन्म झाला । ऐकून घे नीट सांगतो तुजला ।
आपल्या ह्या भारतभूमीला । थोर एक ऋषि होऊन गेला ।

'नारायण' पुण्य नाम त्याला। जगाच्या कल्याणास झटला।
महात्मा विश्ववंद्य ठरला। तोच नव रूपें अवतरला।
अखिल विश्वाच्या विकासाला ॥ खरोखरी दादा॥
॥ दादा रं जीरं दाजी ॥ 6.

'राम' त्रेतायुगीं अवतरला। 'कृष्ण' द्वापारयुगीं झाला।
तोच मी 'रामकृष्ण' बाळा। सत्य हें जाण अंतराला।
आधींच हें ठाउक होतं मजला। येणार तूं माझ्यादर्शनाला
खर वाटेना नरेंद्राला। धीर धरून त्यानं सवाल केला।
पाहिलंय का आपण देवाला। दिसतो कसा असतो कुठं बोला
सांगाल का भेटेल काय मला॥ कधीं तरी दादा॥
॥ दादा र जीरं दाजी ॥

बोलले परमहंस त्याला। आहे मी देव पाहिलेला।
त्याच्या संगें मी बोललेला। देव चराचरांत बघ रमला।
जसा तो माणसांत बसला। तसा खगमृगांमध्यें बसला।
जसा तरुलतांत तो वसला। दगडधोंड्यांतहि तो नटला।
खचित भेटेल देव तुजला। जेव्हां तळमळशील भेटीला।
स्तंभामध्ये प्रल्हादाला दिसला॥ नरहरी दादा॥
॥ दादा रं जीरं दाजी ॥

(चाल)

जड वस्तुमध्यें परमेश। यावरी बसे न विश्वास॥
तेव्हां रामकृष्णांनीं स्पर्श। केला नरेंद्राच्या हृदयास॥
लागली समाधी खास। अनुभवे अलौकिक हर्ष॥
येतसे शांति उदयास। अद्वैत भाव चित्तास॥
सर्वत्र दिसे परमेश। धरि विविध, रूप, गुण,
~~भाव~~ वेष॥

गुरुदेवांच्या संगें राहुन ध्यान धारणा करित बसे।
स्वतःच्या अध्ययनाविषयीं कधिं दुर्लक्ष करीत नसे॥
बी.ए. होण्यापूर्वी आपदा पूज्य पित्याच्या निधनाची
सहा जणांचे कुटुंब पोषण वेळ कसोटीची त्याची॥
अर्ज धेऊनी नोकरीसाठीं व्यर्थच हेलपाटे मारी।
प्रसन्न नच हो, नरेंद्रावरी नोकरीदेवीची स्वारी॥
दारिद्र्याचे चटके भारी असह्य बोजा कर्जाचा।
उपासमारी कशी टळावी सवाल जीवनमरणाचा॥
मनापासुन भक्ति केली।
परि हाल असे कां भाळी।
अति निष्ठुर का वनमाळी।
रामकृष्ण समजावित त्याला धीर धरी रे धीर धरी।
कालीमातेकडे माग वर जाऊनियां दक्षिणेश्वरीं॥

(चाल)

आली स्वारी दक्षिणेश्वरीं। कालिमंदिरीं। मूर्तिसमोरी।
दर्शनासाठीं ध्यान धरणार॥ चिंतामुक्तिचा हट्ट धरणार
मातेला आर्त कथन करणार॥
एक टक दृष्टि लावुनी। ठाण मांडुनी। 'धांव गे क्षणीं'।
मातेचा नाम गजर करणार॥

(चाल) (संस्कृत श्लोक - भजन)

जगज्जननि जय जय जय दुर्गे! जगदम्बे! मातः!
कृपाकटाक्षं कुरु मयि, कुर्वे तवाऽरतिं भक्तः॥

असा मातेचा गजर करणार। नामाचा जागर हि करणार
विसरुनी तहानभूक जाणार।
कां न मग होईल साक्षात्कार॥

नरेंद्राची भक्ति पाहुन । येई धांवुन । देई दर्शन ।
अष्टभुजा देवी आपल्या भक्तास ॥ बारा वाजतां
निशा समयास । बोले 'मी प्रसन्न! माग वरास!' ॥

(चाल) गंभीर शब्द जगदंबेचा घुमे गाभाऱ्यास । ऐकू आला
नरेंद्रास । झाला हर्ष हृदयास । मनी करी विचारास । दे ग
देवी धनरास । दे ग सुबत्ता घरास । असे मागणे मागूं
साचार ॥ साचार हो ॥ पारि काय झाला चमत्कार ॥
उघडुन तोंड मागूं जातां वर हे सगळे । तोंच अकल्पित घडले ।
पहिले शब्द विराले । दुजे शब्द स्फुरले । नवल काय घडले । त्याचे
मुख वदले । हे माते! मला बुद्धि दे ॥ बुद्धि दे हो ॥ जनसेवेसाठी
शक्ति दे ॥

(चाल)

रामकृष्ण पडले आजारी कर्करोगानं ॥
करि नरेंद्र त्यांची सेवा भक्तिभावानं ॥
एके दिवशी नरेंद्र बसला लावुनी ध्यान ॥
एकाएकी समाधि लागली उरे ना च भान ॥
आसपास जगाचें झाले त्यास विस्मरण ॥
न च कानीं पडे गुरुजींची हांक जवळून ॥
उतरतां समाधि गुरुदेव बोलले वचन ॥
बेटा कालिमातेने दिले तुला दर्शन ॥
योगशक्ति मोठि मम केली तुला अर्पण ॥
'जा पुढे अमृतपुत्रा!' तुजला मम आशीर्वचन ॥
कर हिन्दुधर्माचे जगभर प्रतिपादन ॥
कर हिन्दु तत्वज्ञानाचे गुणगान ॥
जगीं भारत कीर्तिध्वजा फिरव डौलानं ॥
वाढवीं कृतीनें निजराष्ट्राचा मान ॥

शिष्यास बोध हा अमृततुल्य देऊन ॥
परलोकीं रामकृष्णांनीं केलें प्रस्थान ॥

(चाल)

रामकृष्णांच्या नांवानं । मठ स्थापुन । चिरंतन स्मरण ।
परमहंसांचे शिष्य करती ॥ दिली जी गुरुदेवं ह्याती । तेवत
ठेवती भक्ति ज्योति । बडानगराची बडी ख्याती ॥

(चाल)
(जी जी)

१८८६ त्या येत रामकृष्ण समाधिला ॥
दोन वर्षे पुढं शिष्यांचा बेत जाहला ॥
नरेंद्रहि अतो एन पंचावीशिला पोंचला ॥
खडान् खडा फिरून बघुं सर्व भरतभूमिला ॥
फिरतां फिरतां येई हिमगिरीचारिल जंगला ॥
घनदाट घाट, तुडवीत वाट चालला ॥
तोंच भला मोठा वाघ पुढं येऊन राहिला ॥
मनासारखं घडे ना व्यर्थ जन्म जाहला ॥ (लाभला ॥)
वाघाची शमवो भूक निधान देह हा भला ॥
असं म्हणुन वाघापुढं खडाच; नच हालला ॥ (भागला ॥)
पाहुनी सिंहाची धाती वाघ लाजला ॥
कांहीं ईजा न करतां सोडुन जाय त्या स्थला ॥
'देव तारी त्यास कोण मारी' ऐका दाखला ॥

(चाल) आशीर्वाद गुरुपत्नीचा । घेऊनी शारदादेवींचा ॥
कळवळा दीनदुबळ्यांचा । करी दौरा उभया देशाचा ॥
पाहुनी ह्रास धर्माचा । तसा फेरा दुष्काळाच्या ॥
फाटला कलेजा त्याचा । करी धांवा जगज्जननीचा ॥
आसरा घेई गुंफेचा । होई साक्षात्कार कालीचा ॥

(चाल) फिरतां फिरतां दक्षिणेस ये कन्याकुमारीला।
कुमारीच्या मंदिरी बैसोनि ध्यानधारणेला॥
अनन्य भावें प्राप्ति शिवाची होय कुमारीला।
अनन्य प्राप्ति ज्ञानाशिवाची तशी नरेंद्राला॥
हिंदमहासागरी शिळेवर स्फुरे जीवनार्थ।
पवित्र म्हणुनी शिळा वंद्य ती ठरे पुण्यतीर्थ॥
गुरुदेवांनी दर्शन दिधले कौल दिला उजवा।
सर्वधर्मपरिषदेंत जाऊन हिंदुधर्म सजवा॥
जशी भवानी वरदानी दे शिवाजीस साक्ष।
तसा उचलती शिष्याच्या वर परमहंस पक्ष॥
खेत्रीच्या राजांनी प्रार्थना केली नरेंद्राला।
'स्वामी विवेकानन्द' म्हणवुनी तारा जगताला॥
१८९३ सालाला अमेरिका खंडीं।
भगवा फेटा शिरीं चालला संन्यासी मुंडी॥
वंदुनी कालिमातेला।
श्रीरामकृष्ण प्रतिमेला।
घेऊनी करीं गीतेला।
जसा एकटा शिवा तोडि दे बलाढ्य सत्तांना।
तसाच हा एकटा तोडि दे धनाढ्य मत्तांना॥

(चाल) १८९३ सालाला। अमेरिका खंडांतील शिकागोनगराला॥
सप्टेंबर ११ तारखेला। सर्वधर्मपरिषद सुरू डंका गाजला॥
प्रत्येक धर्मप्रतिनिधीला। मिळणार संधि निज मतप्रदर्शनाला॥
शिकागोंत पाय ठेवला। जाणीव झाली बोलावणं नाहीं आपणाला॥
अज्ञात मुलुख तो सगळा। नाहीं ओळखपाळख कोणाची सभेंत बोलण्याला॥
प्रोफेसर राईट समयाला। भेटले अकल्पित दूर झाला अडथळा॥

(चाल-कटाव १)

कोलंबस दिवाणखान्याला। भव्य मंचाला। दहा वाजण्याला। हजारों श्रोत्यांना। प्रकार काय दिसला। सांगतो तुम्हाला। देवुन कानाला। ध्यावं ध्यानाला। बारा धर्मांचे प्रतिनिधि येत समयाला॥

(चाल-कटाव २)

एका बाजुच्या पडवीमधुनी। विविध फडकत्या ध्वजांखालुनी। हातामध्यें हात घेऊनी। जणुं हृदयासी हृदय जोडुनी। तन्मयतेनें मिळुनि मिसळुनी। मधुर स्मित तें देत विखरुनी। पाहुन मनउल्हासें भरुनी। उत्साहानें स्वागत करुनी। अमेरिकेंतिल सुज्ञ जनांनी। जयध्वनी घुमवियला गगनी॥

कार्डिनल गिबन्स महाशयांनीं। अमेरिकेच्या (USAच्या) धर्मगुरुंनीं। लोहित वर्णी वस्त्र नेसुनी। बसुन मध्योमध्य उच्च आसनीं। कार्यवाहिची केली आंखणी॥

ब्राह्म बौध्द वा प्रतिनिधींनीं। तसेंच मुस्लिम मजहबियांनीं। वेष नेसुनी विचित्र वर्णी। भपकेदार भडक रंगांनीं भूषवियल्या बाजू दोन्ही॥

(चाल)

ब्राह्मसमाजी नगरकरांचा। श्वेत वेष नारिंगी धारेचा। धम्मपाल विद्वान लंकेचा। शुभ्र वेष त्या बौध्द गुरुचा। काळया भोर कुरळ केसांचा। स्कंधीं रुळतो कलाप त्याचा। पारसिकांचा कॉन्फ्युशियन्सचा। उंची रेशमी वेष तयांचा। पाहुन थाट विविध रंगांचा। साज शोभला इंद्रधनूचा॥

(चाल)

प्रतापचंद्र मुझुमदार मुख्य ब्राह्मसमाजाचे॥
शोभले विरक्तायोग्य वेषभूषेचे॥

वेष काळा छान वक्तृत्व आंग्ल भाषेचें ॥
नामांकित ग्रीक आर्चबिशप हजर झांटेचे ॥
वक्षःस्थळीं वैभव भव्य लांब दाढीचें ॥
टोपडें शिरावर विचित्र आकाराचें ॥
पट्ट्यास कटिस भूषण रुक्के क्रूसाचें ॥ (रजत क्रूसाचें ॥)
दैइभाग्य पेलणें भाग्य कोरिव काठीचें ॥

(चाल) लाल गालयुत नारिल यती आशियामायनरच्या ।
अन्ननिवासासाठीं अजुनि ज्या पैइ लागतो नच खर्चा ॥
मेथॉडिस्ट वा प्रॉटेस्टंट वा कृष्णवर्ण ते पुरोहित ।
पार्श्वभूमि रमणीय तयांची शोभे सुंदरींसमवेत ॥
अशा प्रतिनिधींमध्ये तेजे ।
रक्तवर्ण वेषांत विराजे ।
मुख शोभे रविबिंबाइ लाजे ।
शिरीं केसरी फेटा साजे ।
बृहस्पतीसम वाग्विभवानें संन्यासी तो शोभतसे ।
कर्णामृत बोधामृत पारिसुन श्रोतृवृंद तो लोभतसे ॥

(चाल) "My American Brothers and Sisters!"
Were the only words he uttered;
So much they inspired listeners,
That for minutes the clapping
occured.

(चाल-फटका) सर्व धर्म ब्रह्मासच मिळती जशा सागराला सरिता ।
व्यर्थ पंथपंथांत भांडणें समन्वयें ये सुख जगता ॥
विविध पाकळ्या कमळालागीं सर्व मिळोनी फूल बनो ।
तसे शिकवती विविध धर्म ते सहकारानें सुभग जिणें ॥

धर्मवेड, धर्मच्छळ यांची जगास जरुरी मुळींच नसे।
सहिष्णुतेची श्रेष्ठ भावना अमर जगीं दैवी विलसे॥
हिंदु धर्म तर चराचराला मानी मुक्तिचा अधिकारी।
आत्मा परमात्मा अभिन्न हो, रूप तयाचें अविकारी॥
कवटाळा रंजले गांजले, दुःखी जनांचे अश्रु पुसा।
दुजें कोणतें कार्य ईश्वरी ? घ्या सत्याचा धीर वसा॥

(चाल)

अमेरिका खंड जिंकलें। अध्यात्माचें भलें। बीज पेरलें। पीक भरघोस मिळे जगता॥ पूर्व पश्चिम ऐक्य घडतां। जगीं वाहतील सुखसरिता॥

रमणीय पोवाडा छंद। त्यांत सुखकंद। विवेकानंद-। गुणांचा घेऊन सुमगंध॥ वसन्तराय लिही कवनबंध। गाई सदानंदीं होऊन धुंद॥ (गाई सदानंद होऊन धुंद॥)

मुम्बई :
दि. १२.९.१९८२.

—xox—